दै. गोदातीर दि. 10/01/25

# स्थानिक गुन्हे शाखेकडून चार पिस्तूल व तीन जिवंत काडतूस जप्त, चार जणांना केली अटक

नांदेड (प्रतिनिधी)– शहर व जिल्ह्यात हातात घातक पिस्तूलसारखे शस्त्र बाळगून रेकॉर्डवरील चार सराईत गुन्हेगारांना स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या मार्गदर्शनाखाली फौजदार मिलिंद सोनकांबळे यांच्या टीमने गुरुवार, दि. ९ जानेवारी रोजी अटक केली. त्यांच्याकडून चार पिस्तूल आणि तीन जिवंत काडतूस जप्त केले आहेत. चारही आरोपींची कसून चौकशीनंतर त्यांना नांदेड ग्रामीण पोलिसांच्या स्वाधीन केले आहे.



पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी नांदेड शहरात तसेच जिल्ह्यामध्ये शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अवैध धंद्यावर कार्यवाही करुन तसेच रेकॉर्डवरील आरोपीतांना चेक करुन कायदेशिर कारवाई करण्याबाबत तसेच विनापरवाना बेकायदेशिररित्या अग्नीशस्त्र व शस्त्र ताब्यात बाळगणाऱ्या इसमाविरुद्ध कायदेशिर कारवाई करण्याबाबत अधिनस्त सर्व अधिकारी व अंमलदार यांना आदेश दिलेले होते.

९ रोजी पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे व त्यांचे सहकारी अंमलदार तिरुपती तेलंग, रविशंकर बामणे, मिलिंद नरबाग, अफजल पठाण, चंद्रकांत स्वामी, राहुल लाटकर आणि सिद्धार्थ सोनसळे यांच्या टिमने विनापरवाना बेकायदेशिर रित्या अग्नीशस्त्र व शस्त्र ताब्यात बाळगणाऱ्या इसमाविरुद्ध कायदेशिर कारवाई करीत असताना गोपनीय माहिती मिळाली की, आरोपी आलम गबरु शेख (वय २० वर्षे रा. धानोरा ता. लोहा जि. नांदेड) हा अग्नीशस्त्र (पिस्टल) ताब्यात बाळगुन विक्री करीत आहे. त्यावरुन आरोपी विजय प्रकाश बोईनवाड (वय २१ वर्षे रा. सरस्वती नगर जवळ, धार्माबाद), सुरज शेषराव वंजारे (वय २१ वर्षे रा. पिंपळकौठा (मगरे) ता. मुदखेड जि. नांदेड या दोघांना मामा चौक, नांदेड येथून मुद्देमाला-सह ताब्यात घेण्यात आले आहे. त्याचबरोबर आरोपी आलम गबरु शेख वय २० वर्षे रा. धानोरा ता. लोहा, जि. नांदेड, विजय भास्कर कंधारे (वय २३ वर्षे रा. समगा ता. जि. हिंगोली) यांना लोहा जि. नांदेड येथून ताब्यात घेण्यात आले आहे. या चार आरोपीतांच्या ताब्यातून चार अग्नीशस्त्र (पिस्टल) व तीन जिवंत काडतूस जप्त करण्यात आले आहे. त्या सबंधाने पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण, नांदेड व पोलीस स्टेशन लोहा जि. नांदेड येथे गुन्हे दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाईमध्ये सहभागी असलेले अधिकारी व अंमलदार यांना बक्षीस जाहीर करुन चांगल्या कारवाईचे कौतूक केले आहे.